मा.अति.महा.आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका
ठराव क्र:- १/३३८
दिनांक :-२०/०७/२०१५

अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.:-अमआ(ज)/उआ(सा.प्र.)/आस्था/२९००
दिनांक :-२०/०७/२०१५

## - : आज्ञापत्र : -

विषय :- पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील "मुख्य प्रयोगशाळा तंत्रज्ञ" (पे बॅन्ड रु.९३००-३४८००+ ग्रेड पे ४५००+ मान्य भत्ते) या हुद्याच्या रिक्त जागांवर बढतीने नेमणूकीबाबत.

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. १/२७८, दि.३०/०६/२०१५
२) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठराव क्र. १/२८६ दि.३०/०६/२०१५
३) आज्ञापत्र जा.क्र. अमआ(ज)/ उआ(सा.प्र.)/आस्था/१७७९, दि.३०/०६/२०१५

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील "मुख्य प्रयोगशाळा तंत्रज्ञ" (पे बॅन्ड रु.९३००-३४८००+ ग्रेड पे ४५००+ मान्य भत्ते) या हुद्याचे जागांवर बढतीने हंगामी नेमणूक करणेसाठी संदर्भ क्र.१ चे ठरावान्वये मान्य झालेल्या निवडयादीवरील खालील उमेदवाराची संदर्भ क्र.२ चे मान्यतेनुसार त्यांचे नावांसमोर दर्शविलेल्या तपशिलाप्रमाणे बढतीने हंगामी नेमणूक करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सेवकाचे नांव व नेमणूकीचा गट | नेमणूकीचा हुद्दा, वेतन श्रेणी, खाते | शेरा |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती कविता जितेंद्र पोळ (कावळे) (खुला) | "मुख्य प्रयोगशाळा तंत्रज्ञ" (पे बॅन्ड रु. ९३००- ३४८०० + ग्रेड पे ४५०० + मान्य भत्ते) आरोग्य कार्यालय | श्रीमती यशप्रदा प्रमोद जोगळेकर यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त जागी हंगामी नेमणूक |

१) मे.राज्य शासनाकडील दि.१३/०३/२००७ चे शासन निर्णयात नमूद केल्यानुसार मे.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदरच्या पदोन्नत्या याचिका क्र. ८४५२/०४ च्या निर्णयास अधीन राहून करण्यात येत आहेत.

२) वरील सेवकाची नेमणूक सेवानियम १०(अ) नुसार कामावर प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या परिविक्षा (Probation) कालावधीसाठी आहे. परिविक्षा कालावधीमध्ये संबंधित उमेदवाराचे काम, वर्तणूक व उपस्थिती असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास त्यांना कोणतीही कारणे अगर पूर्वसूचना न देता त्यांना बढतीपूर्व पदावर तात्काळ पदावनत करण्यात येईल.

Lab Tech
35

३) वरीलप्रमाणे बढती मिळालेल्या सेवकांना वेतनश्रेणी बाबतचा पर्याय मनपा सेवाविनियम २३ (अ) नुसार स्विकारावयाचा असेल तर त्याबाबतची मुदत ३ महिने पर्यंत आहे याची नोंद घ्यावी.

४) मा. मागासवर्ग कक्ष, पुणे महागनरपालिका यांचेकडून "मुख्य प्रयोगशाळा तंत्रज्ञ" या पदाची बिंदू नामावली प्राथमिक तपासणी करून घेण्यात आली असून अंतिम तपासणी मा. मागासवर्ग कक्ष , विधानभवन यांचेकडून करून घेण्यात येणार आहे. "मुख्य प्रयोगशाळा तंत्रज्ञ" हे पद अत्यावश्यक सेवेतील असून कामाची आवश्यकता व खात्याची निकड लक्षात घेता मा. मागासवर्ग कक्ष, विधानभवन यांचे अंतिम मान्यतेच्या अधिन राहून सदरच्या नेमणूका करणेत येत आहेत. त्यानुसार आरक्षणात बदल झाल्यास त्याप्रमाणे आवश्यकती कार्यवाही करण्यात येईल.

५) वरील सेवकांस मनपा सेवाविनियमानुसार वेतन व मान्य भत्ते आदा करण्यात यावेत.

तरी, संबंधीत मा.खातेप्रमुख यांनी वरीलप्रमाणे जरुर ती पुढील तजविज करावी.

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत :

१) संबंधित मा.खातेप्रमुख

२) श्रीमती कविता जितेंद्र पोळ (कावळे)

यांजक डेस माहितीसाठी व पुढील तजविजीसाठी रवाना . . . .

उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

Lab Tech
36